श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

ऋषभ गीता द्वितीय अध्याय(भा॰म॰5.2)



भरत सहित शत पुत्रों को जो दिया दिव्य उपदेश।
ऋषभदेव ने मार्ग दिखाकर गीता कही विशेष

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
पञ्चम स्कन्धः
॥ द्वितीयोऽध्यः ॥

श्रीशुक उवाच

एवं(म्) पितरि सम्प्रवृत्ते तदनुशासने वर्तमान
आग्नीध्रो जम्बूद्वीपौकसः(फ्) प्रजा औरसवद्धर्मावेक्षमाणः(फ्) पर्यगोपायत् ॥ 1॥

श्रीशुकाचार्य म्हणतात - अशा रीतीने पिता प्रियव्रत तपश्चर्येत गढून गेल्यानंतर राजा अग्नीध्र त्याच्या आज्ञेचे पालन करीत जंबुद्वीपातील प्रजेचे धर्मानुसार पुत्रवत पालन करू लागला.

स च कदाचित्पितृलोककामः(स्) सुरवरवनिताक्रीडाचलद्रोण्यां(म्)
भगवन्तं(वँ) विश्वसृजां(म्) पतिमाभृतपरिचर्योपकरण
आत्मैकाग्र्येण तपस्व्याराधयाम्बभूव ॥ 2॥

एकदा पितृलोकाच्या इच्छेने पुत्रप्राप्तीसाठी पूजासाहित्य घेऊन अप्सरांचे क्रीडास्थान असलेल्या मंदाराचलाच्या एका दरीत तो गेला आणि एकाग्र चित्ताने प्रजापतींचे पती श्रीब्रह्मदेव यांची तपश्चर्येने आराधना करू लागला.

तदुपलभ्य भगवानादिपुरुषः(स्) सदसि गायन्तीं(म्)
पूर्वचित्तिं(न्) नामाप्सरसमभियापयामास ॥ 3॥

आदिदेव भगवान ब्रह्मदेवांनी त्याची अभिलाषा जाणून आपल्या सभेतील गाशिका पूर्वचित्ती नावाच्या अप्सरेला त्याच्याकडे पाठविले.

सा च तदाश्रमोपवनमतिरमणीयं(वँ) विविधनिबिडविटपि-
विटपनिकरसं(म्)श्लिष्टपुरटलतारूढस्थलविहङ्गमिथुनैः
प्रोच्यमानश्रुतिभिः(फ्) प्रतिबोध्यमानसलिलकुक्कुटकारण्डव-
कलहं(म्)सादिभिर्विचित्रमुपकूजितामलजलाशयकमलाकरमुपबभ्राम ॥ 4॥

अग्निध्राच्या आश्रमाच्या जवळ एक अतिशय रमणीय असे उपवन होते. तेथे ती अप्सरा विहार करू लागली. त्या उपवनामध्ये निरनिराळ्या घनदाट वृक्षांच्या फांद्यांवर फुलांनी बहरलेल्या वेलींनी परिसर सजलेला होता. त्यांच्यावर पुष्कळ प्रकारच्या जातीजातींच्या पक्ष्यांच्या जोड्या मधुर आवाजात कुजन करीत होत्या. त्यांच्या किलबिलाटाने आनंदित झालेले पाणकोंबडे, चक्रवाक, कलहंस इत्यादी पाणपक्षी वेगवेगळ्या तऱ्हेने कुजन करीत होते. त्यामुळे तेथील कमळ-पुष्पांनी सुशोभित निर्मळ सरोवर दुमदुमली होती .

तस्याः(स्) सुललितगमनपदविन्यासगतिविलासायाश्चानुपदं(ङ्)
खणखणायमानरुचिरचरणाभरणस्वनमुपाकर्ण्य
नरदेवकुमारः(स्) समाधियोगेनामीलितनयननलिनमुकुल-
युगलमीषद्विकचय्य व्यचष्ट ॥ 5॥

तामेवाविदूरे मधुकरीमिव सुमनस उपजिघ्रन्तीं(न्)
दिविजमनुजमनोनयनाह्लाददुघैर्गतिविहारव्रीडा-
विनयावलोकसुस्वराक्षरावयवैर्मनसि नृणां(ङ्) कुसुमायुधस्य
विदधतीं(वँ) विवरं(न्) निजमुखविगलितामृतासवसहास-
भाषणामोदमदान्धमधुकरनिकरोपरोधेन द्रुतपदविन्यासेन
वल्गुस्पन्दनस्तनकलशकबरभाररशनां(न्) देवीं(न्) तदवलोकनेन
विवृतावसरस्य भगवतो मकरध्वजस्य वशमुपनीतो जडवदिति होवाच ॥ 6॥

पूर्वचित्तीच्या विलासी हालचालींनी आणि पदन्यासांनी पायांतील नुपुरांचा झंकार होत होता. तो मनोहर ध्वनी ऐकून राजकुमार अग्निधाने समाधियोगाने बंद केलेले आपले कमलकळीसारखे असलेले सुंदर डोळे किलकिले

करून पाहिले. तो जवळच त्याला ती अप्सरा दिसली. भुंग्याप्रमाणे ती एका फुलाजवळ जाऊन त्याचा वास घेत होती. तसेच देव व मनुष्यांचे मन आणि डोळे आह्लादित करणाऱ्या आपल्या विलासपूर्ण हालचाली, क्रीडा, लज्जा, विभ्रम, कटाक्ष, सुमधुर वाणी, आणि अंगविक्षेप, पुरुषांच्या मनाचा दरवाजा कामदेवाच्या प्रवेशासाठी उघडीत होते. ती जेव्हा हसून बोलत असे, तेव्हा जणू काही तिच्या मुखातून अमृतमय मध वाहत आहे, असे वाटत होते. तिच्या निःश्वासाच्या सुगंधाने मदांध होऊन भ्रमर तिच्या मुखाभोवती फिरत होते. तेव्हा त्यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी म्हणून ती घाईघाईने चालत असताना तिचे स्तन, वेणी आणि कंबरपट्टा हलत असल्यामुळे सुंदर दिसत होते. हे सर्व पाहून कामदेवाने अग्निधाच्या हृदयात प्रवेश करण्याची संधी घेतली, आणि कामातुर होऊन तो तिच्या अधीन होऊन तिला प्रसन्न करण्यासाठी वेड्याप्रमाणे म्हणू लागला.

का त्वं(ञ्) चिकीर्षसि च किं(म्) मुनिवर्य शैले,

मायासि कापि भगवत्परदेवतायाः ।

विज्ये बिभर्षि धनुषी सुहृदात्मनोऽर्थे,

किं(वँ) वा मृगान् मृगयसे विपिने प्रमत्तान् ॥ 7॥

“मुनिवर्य, तुम्ही कोण आहात? या पर्वतावर तुम्ही काय करू इच्छिता? परमपुरुष नारायणांची आपण माया तर नाही ना? मित्रा, बिनदोऱ्याची ही दोन धनुष्ये (भुवया) तू का धारण केली आहेस? यामध्ये तुझा काही हेतू आहे की, संसाररूपी अरण्यात माझ्यासारख्या बेसावध हरिणांची शिकार करू इच्छितोस?”

बाणाविमौ भगवतः(श्) शतपत्रपत्रौ,

शान्तावपुङ्खरुचिरावतितिग्मदन्तौ ।

कस्मै युयुङ्क्षसि वने विचरन् न विद्मः(ह्),

क्षेमाय नो जडधियां(न्) तव विक्रमोऽस्तु ॥ 8॥

(तिच्या नेत्र-कटाक्षांकडे पाहून,) तुझे हे दोन (कटाक्ष) बाण अतिशय सुंदर आणि धारदार आहेत. कमलदलाप्रमाणे हे शांत असून पंख नसले तरी सुंदर आहेत. वनात विहार करीत असताना हे (बाण) तू कोणावर सोडू इच्छितोस? तुझ्याशी सामना करू शकेल, असा कोणी इथे दिसत नाही. तुझा हा पराक्रम आमच्यासारख्या मंदबुद्धीचे कल्याण करो (म्हणजे झाले).

शिष्या इमे भगवतः(फ्) परितः(फ्) पठन्ति,

गायन्ति साम सरहस्यमजस्रमीशम् ।

युष्मच्छिखाविलुलिताः(स्) सुमनोऽभिवृष्टीः(स्),

सर्वे भजन्त्यृषिगणा इव वेदशाखाः ॥ 9॥

(भ्रमरांकडे पाहून) भगवान, तुझ्या चारी बाजूंनी जे हे शिष्यगण अध्ययन करीत आहेत, ते तर निरंतर रहस्यमय सामगान करीत जणू भगवंतांची स्तुतीच करीत आहेत आणि ऋषिगण जसे वेदांच्या शाखांना अनुसरतात, तसे हे सर्वजण तुझ्या वेणीतून पडलेल्या फुलांचे सेवन करीत आहेत.

वाचं(म्) परं(ञ्) चरणपञ्जरतित्तिरीणां(म्),

ब्रह्मन्नरूपमुखरां(म्) शृणवाम तुभ्यम् ।

लब्धा कदम्बरुचिरङ्कविटङ्कबिम्बे,

यस्यामलातपरिधिः(ख्) क्व च वल्कलं(न्) ते ॥ 10॥

(नुपुरांच्या आवाजाला उद्देशून) ब्रह्मन्, तुझ्या चरणरूप पिंजऱ्यात जो कवडा आहे, त्याचा आवाज तर ऐकू येतो, परंतु रूप दिसत नाही. (कमरपट्टा असलेल्या पिवळ्या साडीतील अंगकांती पाहून) तुझ्या नितंबावर हे कदंब फुलांचे तेज कोठून आले? यांच्यावर तर फिरणाऱ्या कोकिळासारखे गोलाकार मंडळ दिसत आहे. परंतु तुझे वल्कल कोठे आहे?

किं(म्) सम्भृतं(म्) रुचिरयोर्द्विज शृङ्गयोस्ते,

मध्ये कृशो वहसि यत्र दृशिः(श्) श्रिता मे ।

पङ्कोऽरुणः(स्) सुरभिरात्मविषाण ईदृग् ,

येनाश्रमं(म्) सुभग मे सुरभीकरोषि ॥ 11॥

(कुंकुममंडित स्तनांना उद्देशून) द्विजवर, तुझ्या या दोन सुंदर उंचवट्यांत काय भरले आहे? यात काहीतरी अमूल्य असले पाहिजे. म्हणूनच तर तुझी कंबर इतकी बारीक असूनही तू त्यांचे ओझे वाहत आहेस. तेथे माझी दृष्टी खिळून राहिली आहे. आणि हे सुंदर, या उंचवट्यांवर तू हा लालसर लेप कसला लावला आहेस? याच्या सुगंधाने माझा सगळा आश्रम दरवळला आहे.

लोकं(म्) प्रदर्शय सुहृत्तम तावकं(म्) मे,

यत्रेत्य इत्थमुरसावयववापूर्वो ।

अस्मद्विधस्य मन उन्नयनौ बिभर्ति,

बह्वद्भुतं(म्) सरसराससुधादि वक्त्रे ॥ 12॥

मित्रवर, मला तुझा देश तरी दाखव. जेथील निवासी आपल्या वक्षःस्थळावर असे अद्भुत अवयव धारण करतात, त्यांनी आमच्यासारख्यांचे चित्त प्रक्षुब्ध होते. तसेच मुखामध्ये ते हावभावयुक्त मधुर भाषण, अधरामृत इत्यादी अद्भुत वस्तू बाळगतात.

का वाऽऽत्मवृत्तिरदनाद्धविरङ्ग वाति,

विष्णोः(ख) कलास्यनिमिषोन्मकरौ च कर्णौ ।

उद्विग्नमीनयुगलं(न्) द्विजपङ्क्तिशोचि-

रासन्नभृङ्गनिकरं(म्) सर इन्मुखं(न्) ते ॥ 13॥

हे प्रियवर, तू काय खातोस की ज्यामुळे तुझ्या मुखातून हवन केल्यासारखा सुगंध पसरला आहे? तू विष्णूचा अंश आहेस का? कारण तुझ्या कानांत डोळ्यांची उघडझाप न करणाऱ्या माशांसारखी दोन कुंडले आहेत. तुझे मुख एखाद्या सुंदर सरोवराप्रमाणे आहे. त्यात (चंचल नेत्र आहेत) भयभीत मासे, (दंतपंक्ती आहेत) शुभ्र हंस आणि (कुरळे केस आहेत) भुंगे आहेत.

योऽसौ त्वया करसरोजहतः(फ्) पतङ्गो,

दिक्षु भ्रमन् भ्रमत एजयतेऽक्षिणी मे

मुक्तं(न्) न ते स्मरसि वक्रजटावरूथं(ङ्),

कष्टोऽनिलो हरति लम्पट एष नीवीम् ॥ 14॥

तू जेव्हा आपल्या कोमल हातांनी यशद पाशून हे चेंडू आपटतोस, तेव्हा इकडे-तिकडे जाणारा तो चेंडू पायथ्याच्या डोळ्यांबरोबर मनालाही चंचल करतो. तुझ्या या पोपटाच्या सुटलेल्या केसभार तू का बांधून ठेवत नाहीस? अरे, सोळा वारा तरी किती दुष्ट आहे! तो वारंवार तुझे कटिवस्त्र उडवीत आहे!

रूपं(न्) तपोधन तपश्चरतां(न्) तपोघ्नं(म्),

ह्येतत्तु केन तपसा भवतोपलब्धम् ।

चर्तुं(न्) तपोऽर्हसि मया सह मित्र मह्यं(ङ्),

किं(वँ) वा प्रसीदति स वै भवभावनो मे ॥ 15॥

हे तपोधना, तपश्चर्या करणाऱ्यांचे तप भंग करणारे हे रूप तुला कोणत्या तपाच्या प्रभावाने मिळाले आहे? मित्रा, काही दिवस माझ्या बरोबर राहून तू तपश्चर्या करून विश्वविस्तार करण्याच्या इच्छेने ब्रह्मदेवांनी तर माझ्यावर कृपा केली नाही ना?

नं त्वां(न्) त्यजामि दयितं(न्) द्विजदेवदत्तं(यँ),

यस्मिन् मनो दृगपि नो न वियाति लग्नम् ।

मां(ञ्) चारुशृङ्ग्यर्हसि नेतुमनुव्रतं(न्) ते,

चित्तं(यँ) यतः(फ्) प्रतिसरन्तु शिवाः(स्) सचिव्यः ॥ 16॥

ब्रह्मदेवाने दिलेल्या प्रिय अशा तुला मी सोडणार नाही. तुझ्यावर खिळलेले माझे डोळे दुसरीकडे पाहू इच्छित नाहीत. हे सुंदरी! तुला पाहिजे तेथे तू मला घेऊन चल. मी तुझ्याबरोबर येतो. तुझ्या सुंदर मैत्रिणीही आपल्याबरोबरच राहतील.

श्रीशुक उवाच

इति ललनानुनयातिविशारदो ग्राम्यवैदग्ध्यया

परिभाषया तां(वँ) विबुधवधूं(वँ) विबुधमतिरधिसभा- जयामास ॥ 17॥

श्रीशुक म्हणतात— देवांसारखा बुद्धिमान आणि स्त्रियांना प्रसन्न करण्यात मोठाच कुशल होता. याप्रमाणे त्याने प्रेमयुक्त गोड गोड गोष्टी बोलून त्यायोगे त्या अप्सरेला प्रसन्न करून घेतले.

सा च ततस्तस्य वीरयूथपतेर्बुद्धिशीलरूपवयः(श्)

श्रियौदार्येण पराक्षिप्तमनास्तेन सहायुतायुत-

परिवत्सरोपलक्षणं(ङ्) कालं(ञ्) जम्बूद्वीपपतिना

भौमस्वर्गभोगान् बुभुजे ॥ 18॥

शौर्यवान लोकांत अग्रगण्य असा आणि श्रीमंत बुद्धी, शील, रूप, वय, ऐश्वर्य आणि औदार्य यांनी आकर्षित

होऊन ती अप्सरा त्या जंबुद्वीपाधिपतीबरोबर कित्येक हजार वर्षेपर्यंत पृथ्वी आणि स्वर्गातील भोग भोगीत राहिली.

तस्यामु ह वा आत्मजान् स राजवर आग्नीध्रो
नाभिकिंम्पुरुषहरिवर्षेलावृतरम्यकहिरण्मयकुरुभद्राश्व-
केतुमालसं(ञ्)ज्ञान् नव पुत्रानजनयत् ॥ 19॥

त्यानंतर अग्निध्राला तिच्यापासून नाभी, किंपुरुष, हरिवर्ष, इलावृत, रम्यक, हिरण्मय, कुरु, भद्राश्व आणि केतुमाल नावाचे नऊ पुत्र झाले.

सा सूत्वाथ सुतान्नवानुवत्सरं(ङ्) गृह एवापहाय
पूर्वचित्तिर्भूय एवाजं(न्) देवमुपतस्थे ॥ 20॥

अशा रीतीने दरवर्षी एक याप्रमाणे नऊ वर्षांत क्रमाने नऊ पुत्रांना जन्म देऊन पूर्वीच ती त्यांना राजभवनात सोडून ब्रह्मदेवांच्या सेवेला गेली.

आग्नीध्रसुतास्ते मातुरनुग्रहादौत्पत्तिकेनैव
सं(म)हननबलोपेताः(फ्) पित्रा विभक्ता आत्मतुल्यनामानि
यथाभागं(ञ्) जम्बूद्वीपवर्षाणि बुभुजुः ॥ 21॥

हे अग्निध्राचे पुत्र मातेच्या कृपेमुळे स्वभावतःच सुडौल आणि सशक्त शरीराचे होते. अग्निध्राने जंबुद्वीपाचे विभाजन करून त्यांच्यासारख्याच नावाचे नऊ भूखंड बनविले आणि ते एकेका पुत्राकडे सोपविले. नंतर ते सर्वजण आपल्या राज्याचा उपभोग घेऊ लागले.

आग्नीध्रो राजातृप्तः(ख्) कामानामप्सरसमेवानुदिन-
मधिमन्यमानस्तस्याः(स्) सलोकतां(म्) श्रुतिभिरवारुन्ध
यत्र पितरो मादयन्ते ॥ 22॥
सम्परेते पितरि नव भ्रातरो मेरुदुहितृर्मेरुदेवीं(म्) प्रतिरूपा-
मुग्रदं(म्)ष्ट्रीं(लँ) लतां(म्) रम्यां(म्) श्यामां(न्) नारीं(म्)
भद्रां(न्) देववीतिमितिसं(ञ्)ज्ञा नवोदवहन् ॥ 23॥

दिवसेंदिवस भोग भोगूनसुद्धा महाराज अगदी अतृप्तच होता. तो त्या अप्सरेलाच परम-पुरुषार्थ समजत होता. म्हणून त्याने वैदिक कर्मांनी जेथे पितृगण आपापल्या सुकृतानुसार निरनिराळे भोग भोगतात, त्या अप्सरालोकाची प्राप्ती करून घेतली. पिता परलोकवासी झाल्यानंतर त्या नऊ भावांनी मेरुच्या मेनदेवी, प्रतिस्वा, उग्रदंष्ट्रा, लता, रम्या, श्यामा, नारी, भद्रा आणि देववती नावाच्या नऊ कन्यांशी विवाह केला.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(म्)
पञ्चमस्कन्धे आग्नीध्रवर्णनं(न्) नाम द्वितीयोऽध्यायः ॥